महाराष्ट्र शासन
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर,
मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर- 431 001.
दुरध्वनी क्रमांक 0240-2240591,फॅक्स क्र.0240-2240596
ई मेल :-cp.aurangabad@mahapolice.gov.in

## पोलीस शिपाई भरती २०२२-२३
## मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणी करिता उमेदवारांसाठी सुचना

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील रिक्त असलेल्या २१२ पोलीस शिपाई पदासाठी शारिरीक मोजमाप व मैदाणी चाचणी दिनांक १९/०६/२०२४ ते २६/०६/२०२४ या कालावधीत विभागीय क्रीडा संकुल, गारखेडा परिसर सुतमिल चौक, छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आली आहे. सदर मैदाणी चाचणीमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे जाहिरातीमधील रिक्त पदाचे १:१० प्रमाणात लेखी परिक्षा दि. ७.७.२०२४ रोजी घेण्यात आलेली आहे. मैदानी चाचणी व लेखी चाचणी च्या एकत्रित गुणवत्तेप्रमाणे मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्राच्या अधिन राहुन तात्पुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

**पोलीस शिपाई पदाच्या तात्पुरत्या निवड यादीमध्ये समावेश असलेल्या २१२ उमेदवारांची मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी करिता उमेदवारांनी दि. १३.८.२०२४ रोजी सकाळी ०८.०० वाजता पोलीस मुख्यालय , पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित राहावे.** तात्पुरत्या निवड यादीतील २१२ उमेदवारांनी मुळ कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणी करण्यासाठी खालील नमुद कागदपत्रे सोबत घेवुन येणे आवश्यक आहे.

१. उमेदवारास स्वतःची ओळख पटविण्यासाठी पासपोर्ट/पॅनकार्ड/आधार ओळखपत्र/वाहन परवाना/निवडणूक ओळखपत्र .
२. सर्व मुळ कागदपत्रे व प्रमाणपत्रे
३. सुसपष्ट दिसतील अशा कागदपत्रे व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित केलेल्या २ छायांकित प्रती.
४. उमेदवाराने पोलीस भरतीकरिता येताना शारीरिक व लेखी चाचणीसाठी देण्यात आलेले प्रवेशपत्र .
५. आवेदन अर्जाची सुस्पष्ट प्रत .
६. पासपोट साईजचे ०३ फोटो.

भरती प्रक्रिये दरम्यान आवश्यक ते बदल/निर्णय घेण्याचे अधिकार पोलीस भरती निवड मंडळाकडे राखुन ठेवण्यात आले आहे.

ठिकाण : पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
दिनांक : १०/०८/२०२४.

( शिलवंत नांदेडकर )
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर